
# ६. सेवा हक्क कायदा

## मा. श्री. रजनिकांतभाई श्रॉफ यांचे गौरवणीय कार्य :

शासकीय कामात दप्तरदिरंगाई ही सर्वच सर्वसामान्य नागरिकांची समस्या आहे. पण या समस्येने हतबल न होता त्यासाठी कोणती कायमस्वरुपी कायदेशीर तरतूद करता येईल याचे विचारमंथन श्री. श्रॉफ सर सातत्याने करत होते. या दप्तरदिरंगाईला दूर करणारा कायदा १२ मे २००६ पासून अस्तित्वात आला. परंतु या कायद्यात काही त्रुटी असल्याचे सरांच्या लक्षात आले. या त्रुटी दूर करण्यासाठी काय करता येईल याबाबतचे सूचनापत्र त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पाठविले. आणि या प्रामाणिक प्रयत्नाची दखल सरकारकडून घेण्यात आली. व २००६ कायदा क्रमांक २१ मध्ये मा. श्रॉफ सर यांनी सुचविलेल्या सूचनांनुसार त्यांच्याशी चर्चा करुन सुयोग्य बदल घडविण्यात आले. हा सुधारित कायदा १९ नोव्हेंबर २०१३ पासून पारित करण्यात आला. दि. १९ जानेवारी २०१३ रोजो निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेत मा रजनीकांत भाई श्रॉफ यांनी महाराष्ट्र सरकारने मागविलेल्या सूचना वजा सुधारणा संदर्भात पत्राचार केला होता. एक शैक्षणिक संस्थेचा प्रमुख या नात्याने 'र यानो या सूचना केल्या होत्या. संबंधित नागरिकास शासकीय अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जावर ३० दिवसांच्या आत कार्यवाही करुन उत्तर देणे, क्षेत्रिय पातळीवर कार्यरत " जिल्हा शिक्षणाधिकारी , विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण सह संचालक ( उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांचे कडे सदर अर्जास पोच पावती देणे संबंधी तसेच अनेक सरकारी कामे एक महिन्याच्या आत न झाल्यास वरिष्ठ अधिका ऱ्यांनी याची दखल व न्याय मिळावा अशी अपेक्षा ठेवणे इ. याचा समावेश होता.




या कायद्याने सर्वसामान्य नागरिकांना पुढील फायदे होतील:

१) शासकीय दप्तरदिरंगाईला आळा बसेल.

२) नागरिकांचे अर्ज, फाईल्स्, टिपण्या, पत्र याला ३० दिवसाच्या आत उत्तर देऊन त्यावर कारवाई करणे अनिवार्य ठरेल.

३)

३० दिवसात कारवाई न झाल्यास संबंधीत खात्याच्या ५ वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे त्या अर्जाच्या प्रती पोहचविण्याचा हक्क नागरिकांना

असेल. परिणामी कारवाई अथवा अर्जाचे उत्तर अनिवार्यच होईल. केवळ भ्रष्टाचारासाठी केली जाणारी दिरंगाई कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास करता येणार नाही.
४)

५) नागरिकांच्या मनातील शासकीय कामाबाबतची उदासीनता दूर होऊन शासनाच्या कामातही नियमितपणा येईल. वेळ काढू पणामुळे होणारे संबंधितांचे मानसिक, आर्थिक, शारीरिक नुकसान टाळता येईल.

तत्कालिन मुख्यमंत्री मा .श्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्र शासनाने लोकसेवा हक्क कायदा २०१५ पारित केला आणि त्याचे राजपत्र दि २८ एप्रिल २०१५ प्रकाशित केले . पुढे काही संशोधन करून .२०१६ मध्ये पुन्हा हा कायदा लागू झाला. परंतु सामान्य नागरिकास अजूनही लोकसेवा हक्क कायद्याचे फायदे मिळत नाहीत हे लक्षात येते. म्हणून मा रजनीकांत भाई श्रॉफ यांनी लोक सेवा हक्क अधिनियमार्गत अधिसूचित केलेल्या एकूण ८३ लोकसेवा देणेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम २०१६ मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीने देणे आवश्यक आहे . या साठी सर्व संबंधितांना काही योग्य सूचनांवर कार्यवाही करावी असे आवाहन केले.

१. महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम २०१६ मधील नियम क्र. १७ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जाची नोंदवही तसेच प्राप्त होणाऱ्या प्रथम अपिल व द्वितीय आपल अर्जाची नोंदवही व्यक्तिशः किंवा इलेक्ट्रॉनिक नमुन्यात ठेवावी. नागरिकांना ऑनलाईन पोच अथवा ईमेल ने माहिती मिळावी.

२. सर्व संबंधित अपिलिय अधिकाऱ्यांनी लोकसेवा हक्क अधिनियामांर्गत विहित केलेल्या नियत कालमर्यादेत सेवा देण्याची दक्षता घ्यावी. सेवा देण्यास विलंब होणार नाही व शास्ती करण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. सर्व संबंधित अपिलिय अधिकाऱ्यांनी ‘यांच्या खात्या मार्फत लोकसेवा हक्कांतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवांसाठी दरमहा प्राप्त होणाऱ्या अर्जांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या spreadsheet मध्ये विहित नमून्यात दरमहा ५ तारखेपूर्वी भरण्यात यावे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५  पारित होऊन ९ वर्षाचा कालावधी झाला तरी सामान्य नागरिकांना हा लोकसेवा हक्क म्हणावा तसा न्याय देण्यात कमी पडतो. या साठी मा. रजनीकांत भाई श्रॉफ यांनी मंत्रालयात सामान्य प्रशासन विभाग व अधिकारी यांना पत्रे लिहिली. ‘तत्कालिन महाराष्ट्र राज्याचे माहिती आणि प्रसारण विभागचे डायरेक्टर श्री विरेंद्र सिंग यांची ही भेट घेतली. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा -२०१५ च्या सेक्शन१३,१४,१५,१६,१७, मधील बरेचसे क्लॉजेस मध्ये बदल सूचवला आहे. त्यांचा सर्वात मोठा जोर हा केलेल्या अर्जाची स्थिती ऑनलाईन बघू शकतो आणि वेबसाईट वर तो उपलब्ध असणे हा होय. जेथे ऑनलाईन सर्विस उपलब्ध असेल तिथे ‘ज या लोकांनी अर्ज केला आहे अशा सर्व अर्जांची अपडेट ठेवणे सक्तीचे असावे हे प्रमख आहे.

**प्रा. संजय बहारे**

**एम. के. ज्युनिअर कॉलेज, चिंचणी**